# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचनाक्रमांक २००७/(३२२/०७) विशी -५ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभाग)**

एम. आय.डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली- ४४२६०५ E-Mail -college.section@unigug.ac.in


गों.वि./म.वि.वि.वि./130/२०२६ दिनांक : 25 /०९/२०२६

## परिपत्रक

**विषय:- संविधान जागर उपक्रमाअंतर्गत संविधानातील मुल्यांचा जागर कार्यक्रमास सहकार्य करणे व मदत करणेबाबत.**

**संदर्भ:- DBASS/६३९ दिनांक ०५/०९/२०२६**

गोंडवाना विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक सहाय्यक संस्था, चंद्रपुर सन-२०२१-२२ पासुन 'संविधान जागर उपक्रम' राबवुन यामध्ये संविधानासंबधी छोटी पुस्तिका (भारतीय संविधान लोककल्याणाचा जाहीरनामा) व संविधानाची प्रास्ताविका मोफत वाटप करुन संविधान समजुन घेऊ याविषयी तज्ञ व्यक्ती व विव्दत वक्त्यांकडुन मार्गदशनाचे कार्य करीत आहे. हा उपक्रम लोककल्याणाचा व राष्ट्रहित जोपासण्याचा असल्यामुळे शासन व प्रशासनाचे खुप सहकार्य लाभलेले आहे. हा उपक्रम पाच हजार ठिकाणी घेऊन विस लाख पुस्तिका व प्रास्ताविका वाटप करण्याचे ध्येय सदर संस्थेने जाहीर केले आहे. सदर उपक्रम शासकीय मुख्यालयात नर्सिंग कॉलेजमध्येच सविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

करीता संदर्भीय पत्राचे अवलोकन करुन मा. प्राचार्य यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी यांना वरील कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी अवगत करावे.

हि विनंती.

**सहपत्र :- संलग्नित**

**मा. प्र-कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने,**

(श्री. दिनेश नरोटे)
सहाय्यक कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

प्रतिलिपी -

१. मा. कुलगुरु महोदय यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. कुलसचिव महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Scanned with OKEN Scanner

# DR. BABASAHEB AMBEDKAR SHAIKSHANIK SAHAYYAK SANSTHA, CHANDRAPUR

Reg.No. F/1311(Chanda)

**Ashok Ghotekar**
President

Jatpura Ward No. 3, Panchashil Chowk, Chandrapur (M.S.) 442402
Mob. : 9890215759, 9356264425, E-mail : ashokghotekar4@gmail.com


Ref. No. : DBASS/639 दि.05/09/2026

Date : 05/09/2026

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
आवक/जावक विभाग
आवक 26529 दि. 5/9/26
जावक 26529 दि. 5/9/26

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरूंचे कार्यालय
आवक क्र. 2932 दि. 05/09/26
जावक क्र. 3327 दि. 07/9/26

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक 5863 दि. 8/9/26
जावक 6291 दि. 8/9/26

प्रति,

मा. कुलगुरु
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

R
Pl. do needful
7.9.26

**विषय : संविधान जागर उपक्रमाअंतर्गत संविधानातील मुल्यांचा जागर कार्यक्रमास सहकार्य करणे व मदत करणेबाबत.**

संदर्भ

१) म. रा शासन निर्णय क्रंप्र/२४२५९२–शिक्षण/मंत्रालय विस्तार, मुंबई–४०००३२ . दिनांक १० ऑक्टोबर २०२४.

२) जिल्हाधिकारी चंद्रपूर कार्यालयीन पत्र. कावि/९५२.२०२४, दिनांक १० डिंसेबर २०२४

३) मुख्यकार्यकारी अधिकारी जि. प. चंद्र. यांचे पत्र. क्र/साप्रवि/स्था/२३२/२०२५. दि. १६/०१२०२५

४) शिक्षणाधिकारी (प्राथ.माध्य) जि. प. चंद्र यांचे पत्र. क्र..१२०४/२०२५ दिनांक २५/०३/२०२५

५) गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली यांचे पत्र क्र. गा.वि/आस्था/१४०३/२०२५. दिनांक २२/०४/२०२५

६) पोलीस अधिक्षक कार्या. चंद्र. पोउपअधिक्षक (मु.)/उपक्रम.संविधान/२६–२७० चंद्रपुर दिनांक २४/०७/२०२६.

७) जिल्हाधिकारी चंद्रपूर कार्या पत्र क्र. साशा/कार्या १०/स्थानि २/२०२६/७९८ दिनांक ०५/०८/२०२६

८) मुख्य वनसैरक्षक चंद्र.कार्या.क्र.कक्ष–८(१)/२०२६–२७ १३९२ चंद्रपूर, दिनांक : २८/०८/२०२६

महोदय,

उपरोक्त विषयान्वये व संदर्भिय पत्रानुसार आपणास विनंती आहे की, डॉ. ब्राबासाहेब आंबेडकर शैक्षणिक सहाय्यक संस्था, चंद्रपुर सन २०२१–२२ पासुन 'संविधान जागर उपक्रम' चंद्रपुर जिल्हयात राबवित आहे. यामध्ये संविधानासंबंधी छोटी पुस्तिका (भारतीय संविधान लोककल्याणाचा जाहीरनामा) व संविधानाची प्रास्ताविका मोफत वाटप करुन संविधान समजून घेऊ याविषयी तज्ञ व्यक्ति व विव्दत वक्त्यांकडुन मार्गदर्शनाचे कार्य करीत आहे. आता पर्यत सहाशेचे वर कार्यक्रम होऊन ५०–६० हजार पुस्तके (भारतीय संविधान लोककल्याणाचा जाहीरनामा) व संविधानाची प्रास्ताविका वाटप करण्यात आली आहेत. हा उपक्रम लोककल्याणाचा व राष्ट्रहित जोपासण्याचा असल्यामुळे शासन व प्रशासनाचे खूप सहकार्य लाभलेले आहे. १० ऑक्टोबर २०२४ या महाराष्ट्र शासनाच्या अध्यादेशामुळे व संदर्भीय पत्रानुसार सर्व विभाग प्रमुखांनी दिलेल्या पत्रामुळे पाच हजार ठिकाणी कार्यक्रम घेता येणार असून शासनाच्या आध्यादेशामुळे जिल्हयातील विस लाख नागरीकांपर्यंत संविधानाची जागरुकता करणे शक्य होणार आहे. त्यामुळे हा उपक्रम पाच हजार ठिकाणी घेऊन विस लाख पुस्तिका व प्रास्ताविका वाटप करण्याचे ध्येय सदर संस्थेने सदर जाहीर केले आहे.

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
8/9/26

आपणास विनंती आहे की, महाराष्ट्र शासनाने काढलेल्या संदर्भिय पत्र क्रं. १ व जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी काढलेल्या आदेशानुसार आपण आपल्या शासकिय वैदकीय महाविद्यालयात असलेल्या अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थांना उपस्थित ठेऊन 'संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन करावे. तसेंच आपल्या अधिनस्त असणाऱ्या शासकिय रुग्नालयात नर्सिग कॉलेजमध्ये संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन नियोजन करण्याचे आदेश निर्गमित करावे. व त्या कार्यक्रमाची पुर्वकल्पना संस्थेचे अध्यक्ष अशोक घोटेकर, संविधान जागर उपक्रमाचे मुख्यप्रवर्तक यांना द्यावी. (अधिकाऱ्यांची नावे व मो. नं. देण्याची कृपा करावी.)

कृपया तसेच 'भारतीय संविधान लोककल्याणाचा जाहीरनामा' ही पुस्तीका व संविधानाची प्रास्ताविका उपलब्ध करुन देण्यास सहकार्य करून मदत करावी. नियोजित खर्च रेखिव केला आहे.

चंद्रपूर

दिनांक:

आपला स्नेहांकित

अध्यक्ष

अशोक घोटेकर

संविधान जागर उपक्रमाचे मुख्य प्रवर्तक

**प्रतिलिपी कार्यवाहीस अग्रेशित.**
**मा. हिरेखन साहेब**
**रजिस्टार गोंडवाना विद्यापिठ,**
**गडचिरोली.**

Scanned with OKEN Scanner